माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/००३/२०१७-१८
दि.१२/०१/२०१८.

८।८

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.मनोज प्रताप राणे, ................अपिलार्थी
कार्यालय नं.४, मुकुंद टॉवर,
न्यू गोल्डन नेस्ट रोड,
भाईंदर (पूर्व), जि.ठाणे ४०११०५.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: **विवेचन** :-

श्री.मनोज प्रताप राणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.३०/१२/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१. महानगरपालिकेत कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता कायम करण्यासाठी महानगरपालिकेस विनंती अर्ज अथवा कोणी मागणी केली त्याची छायाप्रत.
२. ठोक मानधनावरील जाने २००१ पासून ठेकेदाराने पुरवठा केलेल्या कनिष्ठ अभियंत्यांना महानगरपालिकेत कायम करण्याबाबत शिफारस कोणी केली होती त्या पत्राची छायाप्रत मिळावी.
३. कंत्राटदाराकडील ठोक मानधनावरील कनिष्ठ अभियंता महानगरपालिकेत कायम करण्यासाठी मा.आयुक्तांना सादर केलेल्या व त्यावर मा.आयुक्तांनी दिलेल्या मान्यतेच्या अहवालाची छायाप्रत मिळावी.
४. दि.०३/०८/२००४ च्या मा.महासभेत मा.आयुक्तांनी कंत्राटी पध्दतीने ठोक मानधनावरील कनिष्ठ अभियंता यांचे प्रकरण क्र.२६ बाबत दिलेल्या गोषवाऱ्याची छायाप्रत.
५. दि.०३/०८/२००४ ठराव क्र.२९ च्या ठरावाची छायाप्रत द्यावी.
६. मा.आयुक्तांनी कंत्राटदाराकडील कनिष्ठ अभियंता कायम करण्यासाठी मा.महासभा दि.०३/०८/२००४ ठराव क्र.२९ प्रमाणे मा.शासनास केलेल्या वेळोवेळीच्या पत्रव्यवहाराची छायाप्रत.
७. मा.शासनास कंत्राटदाराकडील कनिष्ठ अभियंता कायम करण्याबाबत प्रस्ताव महानगरपालिकेने पाठविल्यानंतर शासनाने पाठविलेल्या त्रुटी बाबत पत्रांची व त्यावर महानगरपालिकेने पाठविलेल्या उत्तराची छायाप्रत मिळावी.
८. शासनाने मान्यता दिलेल्या १२ कनिष्ठ अभियंत्यांच्या आदेशाची छायांकित सत्यप्रत मिळावी.

आलेल्या अहवालाची छायाप्रत.

१०. शासन आदेशानुसार कनिष्ठ अभियंते महानगरपालिकेत सामावून घेताना अहवाल सादर केला व त्यावर स्वाक्षरी केलेल्या अधिकाऱ्याची नावे व पदनामे तसेच त्यावेळी कार्यरत आयुक्ताचे नाव व ते कधीपासून कधीपर्यंत आयुक्त म्हणून कार्यरत होते.

११. कनिष्ठ अभियंता यांना सेवेत कायम सामावून घेण्यासाठी अंतिम अहवालास (स्वाक्षरी) मान्यता दिलेल्या आयुक्ताचे नाव व ते कधीपासून आयुक्त या पदावर मिरा भाईंदर महानगरपालिकेत कार्यरत होते त्या आदेशाची प्रत.

१२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ नुसार वर्ग-३ च्या पदावर शासनाचे आदेशानंतर सेवेत सामावून घेण्यासाठी मा.महासभेची मान्यता घेतली असल्यास ठरावाची साक्षांकित छायाप्रत मिळावी.

१३. दि.०३/०८/२००४ पूर्वी महानगरपालिकेत किती कनिष्ठ अभियंताची पदे मंजूर होती त्या सर्व आदेशाच्या प्रती.

१४. १२ कनिष्ठ अभियंतांची पदे मंजूर कधी झाली त्या दि.२३/०८/२००४ आदेशाची छायाप्रत मिळावी.

१५. महानगरपालिकेत कंत्राटी पध्दतीवरील कनिष्ठ अभियंता आस्थापनेवर सामावून घेण्यास मान्यता दिल्यानंतर (दि.२३/०८/२००४ नंतर) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार मा.महासभेची कनिष्ठ अभियंते महानगरपालिकेत आस्थापनेवर सामावून घेण्यास मंजूरी घेतली आहे त्या ठरावाची साक्षांकित छायाप्रत मिळावी.

१६. कंत्राटी कनिष्ठ अभियंते यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम पदावर हजर करुन घेण्यासाठी दिलेल्या आदेशाची छायाप्रत.

१७. कंत्राटी पध्दतीवरील कनिष्ठ अभियंता सामावून घेण्यापूर्वी पदे मंजूर झाल्यावर बिंदु नामावली मागासवर्ग कक्षाकडून तपासणी केल्याबाबत बिंदु नामावलीची छायाप्रत.

१८. १२ कनिष्ठ अभियंते महानगरपालिकेत कायम पदावर सामावून घेताना हजर होतेवेळी सादर केलेल्या शैक्षणिक पात्रतेच्या व वयाबाबत कागदपत्राच्या छायाप्रती.

१९. १२ कनिष्ठ अभियंते याच्यातील मागासवर्ग उमेदवाराची जात वैधता प्रमाणपत्रे पडताळणी केली आहे. त्याच्या जातीच्या वैधता प्रमाणपत्राच्या छायाप्रती.

२०. मा.सर्वोच्च न्यायालयातील स्विहील अपिल क्र.१४१३/३ आणि अन्य यांचेबाबत दि.२८/०७/२००४ व ७७४४/१९९७ या प्रकरणी दि.१८/०२/२००३ रोजी मंजूर केलेल्या आदेशास मा.सर्वोच्च न्यायालयाने मुळ नियुक्ती विहित मार्गाने केलेली असल्याशिवाय सेव नियमित करता येत नाही. तसेच तात्पुरत्या/ अस्थायी स्वरुपात नियुक्त केलेला कोणताह कर्मचारी त्या पदावर कितीही वर्षे सेवेत राहिला तरी कायम करण्याचा हक्क लागू शकत नाही. ही बाब आस्थापना विभागाने मा.आयुक्त सो. व मा.महासभेच्या निदर्शनास आणल असल्यास त्याची छायाप्रत मिळावी.

**<u>अपिल दाखल करण्याची कारणे:-</u>**

... यांनी दि.३०/१२/२०१७ रोजी प्रथ

**<u>सुनावणीचा तपशिल:-</u>**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१२/०१/२०१८ रोजी दुपारी १२.१० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.संगणक/२०२/२०१८ दि.०५/०१/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.३०/१२/२०१७ रोजीच्या पत्रानुसार मला माहिती दिलेली नाही.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: <u>निर्णय</u> :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास अभिलेखाचे निरिक्षण उपलब्ध करुन १० दिवसांत विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन द्यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.मनोज प्रताप राणे,
कार्यालय नं.४, मुकुंद टॉवर,
न्यू गोल्डन नेस्ट रोड,
भाईंदर (पूर्व), जि.ठाणे ४०११०५.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.

Recd
15/1/18